Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील व्हॉलीबॉल, हँडबॉल व कबड्डी खेळाडूंच्या क्रीडाविषयक समस्यांचा अभ्यास

शैलेंद्र देवचंद गिरीपुंजे

डॉ. संजयकुमार सिंह
प्राचार्य
शरदराव पवार महाविद्यालय,गडचांदूर
जिल्हा चंद्रपूर

## १.० प्रस्तावना

क्रीडा आजच्या आधुनिक युगात मनुष्याच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनले आहे. क्रीडा ही व्यक्तीविकासाचे व समाजरक्षणाचे एक साधन मानले गेले. विज्ञानाचे विकासाबरोबर निकोप प्रवृत्ती, सुदृढ शरीर, स्नायूचे कौशल्य, मानसिक उत्साह, फुरसदीच्या वेळेचा समाजोपयोगी व उत्पादक आणि मनोरंजक, सदुपयोगी, सभोवतीच्या सामाजिक परिसराशी आपला संबंध ठेऊन त्यांचे हित साधणे इ. उदिष्टये साध्य करण्यासाठी क्रीडा ही उत्तम माध्यम आहे. महाराष्ट्रात शारीरिक शिक्षणाच्या ज्या परंपरा प्राचीन काळापासून चालू आहेत. त्यात आखाडे, व्यायाम शाळा, शारीरिक शिक्षण मंडळे व काही व्यक्ती यांचा मोठी वाटा आहे. विशिष्ट काळात ठराविक व्यक्तींनी व संस्थांनी शारीरिक शिक्षणाचा प्रसार करण्याची मोठी कामगिरी केली आहे. काळानुसार या पध्दतीमध्ये बदल होत गेला व त्यातून आखाडे, व्यायाम शाळा व व्यायाम मंडळे अशा अवस्था तयार होत गेल्या व शारीरिक शिक्षणाची सुरवात झाली.

शारीरिक शिक्षणाद्वारे शिक्षणाचे सर्व ध्येय व उद्दिष्टये साध्य होत असल्यामुळेच शारीरिक शिक्षणाचे महत्व शैक्षणिक दृष्टया वाढले असून संगणक युगात विज्ञान व तंत्रज्ञानामुळेच शारीरिक शिक्षणालाही एक वलय प्राप्त होऊ लागले आहे. शिक्षण व शारीरिक शिक्षण हातात.हात घालून वावरत असल्यामुळेच शारीरिक शिक्षण हे शिक्षणाचेच एक अंग झाले आहे. शारीरिक शिक्षणाद्वारे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाबरोबरच व्यक्तिच्या शरीराचा, मनाचा, बुद्धीचा तसेच सामाजिक भावनेचाही सर्वांगीण विकास साध्य होतो, हे आता कोणत्याही शिक्षण प्रणालीला खोडून काढणे शक्य नाही. शारीरिक शिक्षण क्षेत्रातील काहिंनी तर शारीरिक शिक्षण एक प्रगत शास्त्र एक प्रगत विज्ञान असे संबोधले आहे. याचाच अर्थ असा की, शिक्षणासोबतच शारीरिक शिक्षण आता मानवी जीवनाचे अभिन्न अंग बनत चालले आहे. पूर्वी खेळाला वैज्ञानिक दृष्टीकोनातून बघीतल्या जात नव्हते. परंतु, आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वैज्ञानिक घटकांचा प्रभाव पडलेला दिसून येतो, व खेळाचे क्षेत्र वगळे राहिले नाही. सर्व खेळ (प्रामुख्याने या संशोधनकार्यात निवडण्यात आलेले व्हॉलीबॉल, हँडबॉल व कबड्डी हे खेळ) मनोरंजन व व्यावसायिक या तत्वांवर खेळल्या जातात. व्हॉलीबॉल, हँडबॉल व कबड्डी हे मैदानी खेळ महाराष्ट्रात लोकप्रिय असले तरी चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयांमध्ये या खेळांसंबंधी विविध समस्या आहेत, ज्यामुळे राष्ट्रीय स्तराचे खेळाडू निर्माण होण्यात अनेक अडचणी उद्भवतात. या कारणामंळे या खेळाडूंच्या विविध समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न या संशोधनकार्यात करण्यात आला आहे.

## २.० संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील व्हॉलीबॉल व हँडबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या समायोजन क्षमतेचा चिकित्सक अभ्यास करण्याकरीता सर्वेक्षण पद्धतीची निवड केलेली आहे.

**२.१ अध्ययन क्षेत्र** – चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे

### २.२ अध्ययन विश्व, जनसंख्या, न्यादर्श पद्धती व नमुना निवड

प्रस्तुत संशोधनात विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हांचा अध्ययन विश्व म्हणून समावेश करण्यात आला आहे व या जिल्हयांतील व्हॉलीबॉल, हँडबॉल व कबड्डी खेळणारे सर्व खेळाडू जनसंख्येत मोडतात. प्रस्तुत संशोधनकार्यात संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना पद्धतीने नमुना निवडण्यात आला आहे. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामधून व्हॉलीबॉल, हँडबॉल व कबड्डी क्रीडा प्रकारातील प्रत्येकी १५० पुरूष खेळाडूची निवड करण्यात आली. निवडण्यात आलेल्या खेळाडूंची वयोमर्यादा १८ ते २५ वर्षे होती.

### २.३ संशोधन आराखडा व तथ्य संकलन

या संशोधनकार्यात तथ्यांचे संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करून वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत अध्ययनात प्रमाणित परिक्षण चाचणी अनुसूची तंत्राचा वापर करण्यात आला.

प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही माध्यमांच्याद्वारे तथ्य संकलन करण्यात आले. संशोधनाकरीता आवश्यक असलेली माहिती एकत्रित करण्याकरीता प्रश्नावली या साधनाचा उपयोग करण्यात आला.

## २.४ तथ्यांचे सांख्यकिय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरीता शेकडेवारी पद्धतीचा वापर करण्यात आला.

## ३.० सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

## ३.१ क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव

**सारणी क्र. १: व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या खेळाडूंचे क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेच्या अभावासंबंधी मत**

| प्रतिक्रीया | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | | कबड्डी खेळाडू | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | ७४ | ४९.३ | ८३ | ५५.३ | ९२ | ६१.३ |
| नाही | ४७ | ३१.३ | २४ | १६.० | २७ | १८.० |
| अनिश्चित | २९ | १९.३ | ४३ | २८.७ | ३१ | २०.७ |
| एकूण | १५० | १००.० | १५० | १००.० | १५० | १००.० |

वरील सारणी क्र. १ मध्ये व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या खेळाडूंचे क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेच्या अभावासंबंधी मत दर्शविण्यात आले आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४९.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंच्या मते क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव असून ३१.३ टक्के खेळाडूंच्या मते क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव नसल्याचे आढळले. तसेच १९.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंनी क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५५.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंच्या मते क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव असून १६.० टक्के खेळाडूंच्या मते क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव नसल्याचे आढळले. तसेच २८.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंनी क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **कबड्डी खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६१.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंच्या मते क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव असून १८.० टक्के खेळाडूंच्या मते क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव नसल्याचे आढळले. तसेच २०.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंनी क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.

## ३.२ खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव

**सारणी क्र. २: व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे योग्य क्रीडा मार्गदर्शनाच्या अभावासंबंधी मत दर्शविणारी सारणी**

| प्रतिक्रीया | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | | कबड्डी खेळाडू | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | ३९ | २६.० | २४ | १६.० | १९ | १२.७ |
| नाही | ८४ | ५६.० | १०२ | ६८.० | १२२ | ८१.३ |
| अनिश्चित | २७ | १८.० | २४ | १६.० | ९ | ६.० |
| एकूण | १५० | १००.० | १५० | १००.० | १५० | १००.० |

वरील सारणी क्र. २ मध्ये व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे योग्य क्रीडा मार्गदर्शनाच्या अभावासंबंधी मत दर्शविण्यात आले आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २६.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव जाणवत असून ५६.० टक्के खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचे अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच १८.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंनी योग्य क्रीडा मार्गदर्शनाच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १६.० टक्के हॅन्डबॉल खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव जाणवत असून ६८.० टक्के खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच १६.० टक्के हॅन्डबॉल खेळाडूंनी योग्य क्रीडा मार्गदर्शनाच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **कबड्डी खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १२.७ टक्के कबड्डी खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव जाणवत असून ८१.३ टक्के खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच ६.० टक्के कबड्डी खेळाडूंनी योग्य क्रीडा मार्गदर्शनाच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.

### ३.३ क्रीडा साहित्याचा अभाव

**सारणी क्र. ३: व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे क्रीडा साहित्याच्या अभावासंबंधी मत दर्शविणारी सारणी**

| प्रतिक्रीया | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | | कबड्डी खेळाडू | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | ९० | ६०.० | ८९ | ५९.३ | ४२ | २८.० |
| नाही | ४२ | २८.० | १९ | १२.७ | ७७ | ५१.३ |
| अनिश्चित | १८ | १२.० | ४२ | २८.० | ३१ | २०.७ |
| एकूण | १५० | १००.० | १५० | १००.० | १५० | १००.० |

वरील सारणी क्र. ३ मध्ये व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या खेळाडूंचे क्रीडा साहित्याच्या अभावासंबंधी मत दर्शविण्यात आले आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६०.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत असून २८.० टक्के खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच १२.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंनी क्रीडा साहित्याच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५९.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत असून १२.७ टक्के खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच २८.० टक्के हॅन्डबॉल खेळाडूंनी क्रीडा साहित्याच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **कबड्डी खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २८.० टक्के कबड्डी खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत असून ५१.३ टक्के खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच २०.७ टक्के कबड्डी खेळाडूंनी क्रीडा साहित्याच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.

### ३.४ क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव

**सारणी क्र. ४: व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे क्रीडा सुविधांकरिता निधीच्या अभावासंबंधी मत दर्शविणारी सारणी**

| प्रतिक्रीया | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | | कबड्डी खेळाडू | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | ११२ | ७४.७ | १२५ | ८३.३ | १०१ | ६७.३ |
| नाही | २४ | १६.० | १६ | १०.७ | २० | १३.३ |
| अनिश्चित | १४ | ९.३ | ९ | ६.० | २९ | १९.३ |
| एकूण | १५० | १००.० | १५० | १००.० | १५० | १००.० |

वरील सारणी क्र. ४ मध्ये व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंचे क्रीडा सुविधांकरिता निधीच्या अभावासंबंधी मत दर्शविण्यात आले आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७४.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंना क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव जाणवत असून १६.० टक्के खेळाडूंना क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच ९.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंनी क्रीडा सुविधांकरिता निधीच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८३.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंना क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव जाणवत असून १०.७ टक्के खेळाडूंना क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच ६.० टक्के हॅन्डबॉल खेळाडूंनी क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **कबड्डी खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६७.३ टक्के कबड्डी खेळाडूंना क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव जाणवत असून १३.३ टक्के खेळाडूंना क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच १९.३ टक्के कबड्डी खेळाडूंनी क्रीडा सुविधांकरिता निधीच्या अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.

प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे

### ३.५ क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव

**सारणी क्र. ५: व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंमध्ये क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव दर्शविणारी सारणी**

| प्रतिक्रीया | व्हॉलीबॉल खेळाडू | | हॅन्डबॉल खेळाडू | | कबड्डी खेळाडू | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| होय | १२६ | ८४.० | १२० | ८०.० | ११५ | ७६.७ |
| नाही | १४ | ९.३ | २२ | १४.७ | १९ | १२.७ |
| अनिश्चित | १० | ६.७ | ८ | ५.३ | १६ | १०.७ |
| एकूण | १५० | १००.० | १५० | १००.० | १५० | १००.० |

वरील सारणी क्र. ५ मध्ये व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंमध्ये क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव दर्शविण्यात आला आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८४.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंना क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव जाणवत असून ९.३ टक्के खेळाडूंना क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच ६.७ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंनी क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **हॅन्डबॉल खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७६.७ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंना क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव जाणवत असून १२.७ टक्के खेळाडूंना क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच ५.३ टक्के हॅन्डबॉल खेळाडूंनी क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.
- **कबड्डी खेळाडू** : सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८०.० टक्के कबड्डी खेळाडूंना क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव जाणवत असून १४.७ टक्के खेळाडूंना क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव जाणवत नसल्याचे आढळले. तसेच १०.७ टक्के कबड्डी खेळाडूंनी क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभावासंबंधी अनिश्चितता दर्शविली.

## ४.० निष्कर्ष

### ४.१ क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंना क्रीडा धोरणात निर्णय प्रक्रियेचा अभाव वाटतो.

### ४.२ खेळाडूंना योग्य क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शनाचा अभाव जाणवत नाही.

### ४.३ क्रीडा साहित्याचा अभाव

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत असून कबड्डी खेळाडूंना क्रीडा साहित्याचा अभाव जाणवत नाही.

### ४.४ क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंना क्रीडा सुविधांकरिता निधीचा अभाव जाणवतो.

### ४.५ क्रीडा संघटनेतील पदाधिकाऱ्यांमध्ये शासकीय योजनेसंबंधी जागरूकतेचा अभाव

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंच्या मते क्रीडा संघटनेतील पदाधिकाऱ्यांमध्ये विविध शासकीय योजनेबाबत जागरूकतेचा अभाव आहे.

### ४.६ क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव

- प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील बहुतांश व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व कबड्डी खेळणाऱ्या महाविद्यालयीन खेळाडूंमध्ये क्रीडा साहित्याकरिता आर्थिक मदतीचा अभाव जाणवतो.

## ५.० संदर्भग्रंथ सूची

१. धुरी नीलम, संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती २००८, पृ.क्र. १.
२. घाटोळे. रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००९–१०.पृ.क्र. १ ते २३.
३. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३, पृ. १४७.
४. बोधनकर सु, अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००३, पृ. ८९.
५. के. सागर, महाराष्ट्रातील जिल्हे, सतरावी आवृत्ती, २०१६, पान क्र. २५९–२६६, २७२.

६. थानी वाई. आर., अम्बष्ट रवी, 'खेल मनोविज्ञान' प्रकाशन खेळ साहित्य केंद्र, दिल्ली, २००५, पृ.क्र. १२३ – १२८.
७. दिक्षीत पु.म., श्री. गुर्जर मा.ध., 'चतुर्थवृत्तीची प्रस्तावना' आयुविद्या मुद्रणालय, जून १९६४, पृ.क्र. १
८. पाण्डेय लक्ष्मीकांत : भारतीय खेलोंकी मिमांसा, मेट्रोपोलिटियन बुक कं. प्रा. लि. नई दिल्ली, पान क्र. १५.
९. शिंदे दौ., भेंडेगिरी र., राव ई. प्र., 'आधुनिक शास्त्रीय कबड्डी प्रशिक्षण' ताटारांनी स्पोटर्स क्लब सोलापूर, मुद्रांक सकाळ प्रिंटीग प्रेस, कोल्हापूर वर्ष १९९६, पृ.क्र. २,३.
१०. महाले सं., कर्डिले व. : संशोधन पद्धती, संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन, प्रकाशक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (२००२)
११. देवेन्द्रसिंग पाल, शारीरिक शिक्षकत्व एवं इतिहास व समस्त खेल मैदान एवं नियम, प्रथम संस्करण, फ्रेन्डस पब्लिकेशन, १९९७, पृ.क्र.२
१२. जरारे वि., संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५–ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, १९९५:७९